अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.८४/२०२४

जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/ ८९८७ दि. १४/१०/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/८४/२०२४

श्री.तुषार सुभाष वनशिव,
सुंदरबन रेसिडेन्सी फ्लॅट ४, दांगट पाटील नगर,
वडगाव बु., सिंहगड रोड पुणे-४११०४१

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.तुषार सुभाष वनशिव, वडगाव बु., सिंहगड रोड, पुणे-४११०४१ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.०७/०८/२०२४ (आ.क्र.८८६८ दि.१६/०८/२०२४) रोजी कार्यालयास प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/५७६४ दि.२२/०८/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०७/०८/२०२४ | १६/०८/२०२४ | ०६/०९/२०२४ | २२/०८/२०२४ | ० |

अपिलार्थी यांनी प्राप्त पत्राच्या उत्तराबद्दल असंतुष्ट / असहमत, असे नमूद करून अपील अर्ज दि.१९/८/२०२४ (आ.क्र.१०८४९,दि.११/०९/२०२४) रोजी दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १९/०८/२०२४ | ११/०९/२०२४ | २१/०९/२०२४ | होय | -- |

अपिल अर्जावर दि.०१/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. ऑफलाईन स्वरुपात सुनावणी आयोजित करण्यात आल्याचे जा.क्र.उआ(सा.प्र)/आस्था/७२०५ दि.२४/०९/२०२४ रोजीचे पत्राद्वारे कळविण्यात आले होते. त्यातील वेळेत अंशतः बदल करून दुपारी १२.००वा आयोजित करण्यात आले असल्याचे जा.क्र.साप्र/७५३०,दि.३०/०९/२०२४ रोजी कळविण्यात आले. तथापि सदर दिवशी अपिलार्थी अनुपस्थित असल्याने सुनावणी पुढील तारखेस दि.०८/१०/२०२४ रोजी सकाळी ११.००वा आयोजित करणेबाबत जा.क्र.उआ(सा.प्र)/आस्था/७७९१, दि.०७/१०/२०२४ रोजी कळविण्यात आले. परंतु सदर सुनावणी दिवशीही अपिलार्थी वैद्यकीय कारणास्तव अनुपस्थित राहिले.

कार्यालयामार्फत दूरध्वनीद्वारे दि.०८/१०/२०२४ व दि.०९/१०/२०२४ रोजी संपर्क साधला असता लेखी म्हणणे सादर करतो, असे अपिलार्थी यांनी कळविले होते. आपिलार्थी यांना दि.११/१०/२०२४ अखेर म्हणणे सादर न केल्याने दूरध्वनीद्वारे संपर्क केला असता आदेश पारित करणेस माझे काहीही म्हणणे नाही असे नमूद केले. सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी प्राप्त पत्राच्या उत्तराबद्दल असंतुष्ट/असहमत, असे नमूद करून अपील अर्ज विभागीय आयुक्त कार्यालयाकडे दि.१९/०८/२०२४ रोजी दाखल केला होता. विभागीय आयुक्त कार्यालयाने जा.क्र.४४१/२०२४,दि.०९/०९/२०२४ रोजी पुणे महानगरपालिकेकडे वर्ग केला. सदर अर्ज उप आयुक्त सामान्य प्रशासन कार्यालयाकडे दि.११/०९/२०२४ रोजी (आ.क्र.१०८४९,दि.११/०९/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाने सदर अपील अर्ज विलंबाने वर्ग केला आहे.

सन २०२३-२४ तत्कालीन विभागीय आयुक्त सो. यांनी आवी/आस्था/चौ/कावि/३७२/२०२३ दि.०४/०९/२०२३ रोजी आदेश पारित करीत पुणे मनपा मध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांतील कर्मचाऱ्यांची (अपात्र) फेरचौकशी करणेकामी त्रिसदस्यीय समिती नेमणूक केली. सदर समितीचा अहवालाची माहिती मिळणेबाबत अर्ज केला होता.

अपिलार्थी अपील सुनावणीस वैद्यकीय कारण देऊन दि.०१/१०/२०२४ व दि.०८/१०/२०२४ रोजी अनुपस्थित राहिले. त्यांना कार्यालयामार्फत दूरध्वनी द्वारे दि.०८/१०/२०२४ व दि.०९/१०/२०२४ रोजी संपर्क साधला असता लेखी म्हणणे सादर करतो, असे अपिलार्थी यांनी कळविले होते. परंतु त्यांनी दि.११/१०/२०२४ रोजी आपले लेखी म्हणणे सादर केले नाही.

माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८(१)(झ) नुसार माहिती देता येत नाही. त्यामुळे सदरची माहिती देण्यात आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

अपिलार्थी यांनी आपले लेखी म्हणणे सादर केले नाही. सबब उपलब्ध माहितीचे आधारे आदेश पारित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(झ) नुसार चौकशी समितीचा अहवाल हा पूर्ण कार्यवाही होईपर्यंत गोपनीय असून तो सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध करून देता येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे, असे अपिलाधिकारी यांनी अपील दरम्यान नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी दिलेली माहिती योग्य आहे. सबब, सदर अपिल क्र.८४/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil
14-10-24

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.